जाहिरातीचा दिनांक : १२/०४/२०१८
ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक : २१/०४/२०१८

# मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद

# जाहिरात

क्रमांक : प्रशासन / 623 / २०१८, दिनांक : 11 /०४/२०१८

मुंबई उच्च न्यायालयाने औरंगाबाद खंडपीठ प्रशासनास शिपाई पदाकरिता प्रत्येकी ७२ उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्याची परवानगी दिली आहे. तथापि, या जाहिरातीद्वारे सध्या फक्त प्रत्येकी ६८ उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्यात येत आहे. त्यानुसार सध्या सुदृढ, इच्छुक व पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदाची वेतनश्रेणी रू. ४४४०-७४४० व ग्रेड वेतन रू. १३०० अधिक नियमानुसार देय भत्ते अशी राहील. उर्वरित चार जागा भरण्यासंबंधीचा निर्णय मुंबई उच्च न्यायलयात दिव्यांगांच्या आरक्षणासंबंधी दाखल झालेल्या रिट याचिका (ल) क्रमांक ११३७/२०१८ मधील आदेशाच्या अधिन राहून किंवा मुंबई उच्च न्यायालयाच्या भविष्यातील अधिसूचनेनुसार, जशी परिस्थीती असेल त्यानुसार, नजीकच्या काळात लगेचच भरण्यात येतील.

## अ) पात्रता :

१. उमेदवार कमीत कमी ७ वा वर्ग पास असावा.

२. जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. उच्च न्यायालयीन व शासकीय कर्मचा-यांना कमाल वयोमर्यादेची अट लागू नाही.

३. शिपाई पदाला अनुषंगिक व दैनंदिन जीवनाला उपयुक्त अशी कला किंवा विशेष अर्हता/प्राविण्य असणा-या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

४. विशेष अर्हता प्राप्त उमेदवारांनी प्रत्यक्ष मुलाखतीचे वेळी त्याबाबत पुरावा म्हणून आवश्यक ते दाखले/अनुभव प्रमाणपत्र सादर करावेत. अशी अर्हता असल्याबाबत, खंडपीठ प्रशासनाकडून पडताळणी करून घेण्यात येईल. सदर दाखल्यांवर संबंधित संस्थेचा/संस्थाप्रमुखाचा शिक्का व सही असणे आवश्यक आहे.

५. जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास अथवा त्यापूर्वी उमेदवारास कोणत्याही फौजदारी न्यायालयाने एखाद्या खटल्यात शिक्षा ठोठावलेली नसावी. अथवा त्याचेविरूध्द कोणतेही फौजदारी प्रकरण/खटला प्रलंबित नसावे.

## ब) अर्ज करण्याची पध्दत :

१. प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही माध्यमाद्वारे आलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

२. पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज http://bombayhighcourt.nic.in या संकेतस्थळाद्वारे दिनांक १२/४/२०१८ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक २१/०४/२०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंतच्या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतर संकेतस्थळावरून अर्ज भरण्याची प्रक्रिया बंद करण्यात येईल.

३. ऑनलाईन अर्ज करतांना उमेदवाराने स्वतः च्या अद्यावत पासपोर्ट फोटोची आणि स्वाक्षरी ची स्वतंत्र ४० KB पेक्षा जास्त साईज होणार नाही अशी .jpg / .jpeg format मध्ये स्कॅन फाईल तयार करून ऑनलाईन अर्जात दर्शविलेल्या ठिकाणी सदर फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे अनिवार्य आहे.

४. ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना http://bombayhighcourt.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. उमेदवारांना ऑनलाईन अर्जातील संपूर्ण माहिती अचूक भरणे अनिवार्य आहे. उमेदवारांनी जाहिरातीचे आणि सुचनांचे वाचन करूनच अर्ज भरावे.

५. सदरील अर्जाची Printout घेउन उमेदवाराने स्वतः कडे जतन करून ठेवावी. मात्र निवड प्रकियेदरम्यान दिलेल्या सूचनेनुसार आवश्यक त्या-त्यावेळी सदरील अर्जाची प्रत उपलब्ध करावी. **उमेदवाराने सदरील अर्जाची प्रत तसेच कोणतीही कागदपत्रे पोस्टाने या कार्यालयात पाठविण्याची आवश्यकता नाही.**

६. उमेदवाराने एकापेक्षा जास्त ऑनलाईन अर्ज सादर केल्यास त्याचे दोन्ही अर्ज बाद करण्यात येतील.

७. उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास त्याने आपल्या विभाग प्रमुखांचे/सक्षम अधिका-याचे ना-हरकत प्रमाणपत्र मुलाखतीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

८. सेवायोजन कार्यालयात नोंदणी केलेल्या उमेदवारांनी, ते सदर पदासाठी पात्र असल्यास, विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करावा.

## क) उमेदवारांसाठी आवश्यक सूचना :

१. केवळ अर्ज दाखल केला यावरून कोणालाही परीक्षेचा/मुलाखतीचा अथवा नेमणुकीचा हक्क असणार नाही.

२. उच्च शैक्षणिक अर्हता, विशेष अर्हता व गुणवत्तेच्या निकषावर पात्र उमेदवारांची अल्पसूची (Short-listing) करण्याचे अधिकार उच्च न्यायालय प्रशासन स्वतः कडे राखून ठेवत आहे. ज्या उमेदवारांची नांवे अल्पसूचीमध्ये आहेत अशांनाच पुढील प्रकियेकरिता बोलावले जाईल. सदरील पात्र उमेदवारांची अल्पसूची मुंबई उच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित केली जाईल.

३. अल्पसूचीतील उमेदवारांना सर्वप्रथम लेखी परीक्षा (३० गुण) द्यावी लागेल. लेखी परीक्षेत पात्र ठरणा-या उमेदवारांनाच पुढील शारीरिक क्षमता व विशेष अर्हता चाचणी (१० गुण) आणि त्यानंतर मुलाखत (१० गुण) साठी बोलविण्यात येईल. वरील परीक्षांसंदर्भातील सविस्तर माहितीसाठी उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळास भेट द्यावी.

४. अल्पसूचीतील उमेदवारांना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र व सविस्तर सूचना पत्र मुंबई उच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील. **त्यांनी ते स्वतः Download करून घ्यावे.**

५. परीक्षेच्यावेळी उमेदवाराने प्रवेशपत्र आणि पडताळणीसाठी ऑनलाईन अर्जाची प्रत व स्वतः चे आधार कार्ड/पॅन कार्ड/वाहन परवाना इ. ओळखपत्र सोबत आणणे बंधनकारक आहे. त्याशिवाय उमेदवारास परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.

६. अल्पसूचीतील उमेदवारांनी खालील दाखल्यांच्या/प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती आणि सत्यप्रती आपल्याजवळ तयार ठेवाव्यात आणि सूचनेनुसार उपलब्ध कराव्यात.

१. जन्मतारखेचा दाखला.
२. महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र.
३. शैक्षणिक पात्रतेच्या परिक्षेचे गुणपत्रक/प्रमाणपत्र.
४. जातीचा दाखला (मागासवर्गीयांसाठी).
५. विशेष अर्हता असल्याबाबतचा दाखला किंवा प्रमाणपत्र.
६. पुर्वानुभव असल्यास त्यासंबंधीचा दाखला.
७. ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या दोन प्रतिष्ठित व्यक्तींनी प्रदान केलेला चांगली वर्तणुक/चारित्र्याबाबतचा दाखला (संबंधित व्यक्तींचे नांव व फोननंबरसह) सदर दाखला जाहिरात प्रसिध्दीनंतरच्या तारखेचा असावा.
८. उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास, त्याच्या कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र.
९. सेवायोजन कार्यालयात नोंदणी केली असल्यास, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.
१०. महिला उमेदवारांनी जर लग्नानंतर नावांत बदल केला असल्यास, नांव बदल केल्याबाबतचे प्रमाणपत्र जसे की, शासन राजपत्र, सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले विवाह प्रमाणपत्र, इत्यादी.

७. पात्र उमेदवारांना लेखी परीक्षा, चाचणी व मुलाखतीसाठी स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

८. कोणत्याही कारणास्तव रिक्त पदांच्या संख्येत बदल झाल्यास अथवा काही तांत्रिक व खंडपीठ प्रशासनाच्या नियंत्रणाबाहेरील परिस्थितीमुळे भरती प्रकिया रद्द झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेच्या प्रकारात बदल करणे, परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे किंवा अंशतः बदल करणे याबाबत सर्व अधिकार खंडपीठ प्रशासनाने स्वतः कडे राखून ठेवले आहेत.

९. निवड प्रकिया सुरु झाल्यानंतर कोणत्याही पातळीवर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी अर्जदाराने अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी नियुक्ती प्रकियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल किंवा नियुक्ती झाली असल्यास नेमणूक रद्द करण्यात येईल.

१०. निवड प्रकियेसंदर्भात निवड समिती अथवा प्रशासनातील कोणत्याही अधिका-यावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष दबाव आणणा-या उमेदवाराचा अर्ज तात्काळ रद्द करण्यात येईल. तसेच त्याचेविरुध्द नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल. यासंबंधी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

११. सदर जाहिरात मुंबई उच्च न्यायालयाचे संकेतस्थळ **http://bombayhighcourt.nic.in** वर आणि मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद या कार्यालयाच्या सूचना फलकावरही उपलब्ध आहे.

मुंबई उच्च न्यायालय, {}
खंडपीठ औरंगाबाद, औरंगाबाद. {}
दिनांक : ११/०४/२०१८ {}

(signature) 11/04/18.
प्रबंधक (प्रशासन)

# <u>ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मार्गदर्शक सूचना</u>

१. ऑनलाईन अर्ज भरणे सुरू करण्यापूर्वी उमेदवाराने शिपाई पदासंबंधीची संपूर्ण जाहिरात वाचावी. ऑनलाईन अर्ज हा इंग्रजी भाषेत भरला जाईल.

२. ऑनलाईन अर्ज भरणे सुरू करण्यापूर्वी उमेदवाराने स्वतः चा अद्‌यावत पासपोर्ट फोटो आणि स्वाक्षरी स्वतंत्र स्कॅन करून ४० केबीपेक्षा जास्त साईज होणार नाही अशी jpg / jpeg format मध्ये दोन वेगवेगळया फाईल्स तयार ठेवाव्यात.

३. ऑनलाईन अर्जातील संपूर्ण माहिती अचूक भरणे उमेदवारास बंधनकारक आहे.

४. उमेदवाराने माहिती भरतांना नांवाची स्पेलिंग त्याच्याजवळ उपलब्ध असलेल्या शैक्षणिक कागदपत्रानुसार अचुक नमुद करावे.

५. उमेदवाराने पत्रव्यवहाराचा सविस्तर पत्ता व अचुक पिनकोड कमांक द्‌यावा, मोघम किंवा अर्धवट पत्ता देऊ नये.

६. उमेदवाराने उपयोगात असलेलाच ईमेल, मोबाईल कमांक द्‌यावा.

७. उमेदवाराने आपली जन्मतारीख शैक्षणिक कागदपत्रे/जन्मप्रमाणपत्राधारे अचुक लिहावी.

८. उमेदवार विवाहित असल्यास, त्याने अपत्यांविषयीची योग्य ती माहिती त्या-त्या रकान्यात भरावी. विवाहित उमेदवारास आज रोजी अपत्य नसेल तर त्याने रकान्यात "0" (शून्य) अशी माहिती भरावी.

९. उमेदवाराने स्वतः चा आधार कार्ड कमांक अचुक नमूद करावा.

१०. शैक्षणिक माहिती भरतांना, जे उमेदवार इयत्ता दहावीपेक्षा कमी शैक्षणिक अर्हता असणारे (Below S.S.C.) आहेत त्यांनी School/Board/University या रकान्यामध्ये शाळेचे नांव लिहावे.

११. <u>**शिपाई पदाला अनूषंगिक व दैनंदिन जीवनाला उपयूक्त अशी कला किंवा विशेष अर्हता/ प्राविण्य** असल्यास ते सविस्तर नमुद करावे व त्यासंबंधीचा दाखला/प्रमाणपत्र योग्य वेळी सादर करावे.</u>

१२. उमेदवारास सदरील पदाचा किंवा विशेष अर्हतेबद्‌दल किंवा इतर काही पूर्वानुभव असल्यास तो नमूद करावा.

१३. उमेदवाराने जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात आपले नांवाची नोंदणी केली असल्यास, नोंदणी कमांक, नोंदणी दिनांक आणि नोंदणी जिल्हा नमुद करावा.

१४. उमेदवाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यास किंवा पुर्वी एखाद्‌या प्रकरणात फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती द्‌यावी. खरी माहिती दडवून ठेवल्यास उमेदवार नियुक्तीस अपात्र ठरेल. नियुक्तीनंतर सदर माहिती प्रशासनाच्या निदर्शनास आल्यास उमेदवारास कोणतीही पूर्वसूचना न देता नौकरीवरून कमी केले जाईल.

१५. उमेदवाराच्या कुटूंबातील व्यक्तीपैकी जर कोणी न्यायिक विभागात जसे की, जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय, इतर न्यायालये, प्राधिकरण इ. ठिकाणी कार्यरत असेल तर त्यासंबंधी माहिती द्‌यावी.

१६. उमेदवाराने त्याला ओळखत असलेल्या दोन प्रतिष्ठित व्यक्तीकडून चांगली वर्तणुक/चारित्र्या बाबतचा दाखला प्राप्त करावा आणि अर्ज भरतांना सदरील व्यक्तींची माहिती अर्जात नमूद करावी. सदरील दाखला हा जाहिरात प्रसिध्दीनंतरच्या तारखेचा असावा.

१७. उमेदवाराने अर्जात योग्य त्या ठिकाणी, ४० केबी पेक्षा कमी आकार असलेल्या स्वतः च्या स्कॅन फोटोची .jpg / .jpeg format मधील फाईल Upload करावी.

१८. उमेदवाराने अर्जात योग्य त्या ठिकाणी, ४० केबी पेक्षा कमी आकार असलेल्या स्वतः च्या स्कॅन स्वाक्षरीची .jpg / .jpeg format मधील फाईल Upload करावी.

१९. अर्ज Submit करण्यापूर्वी उमेदवाराने भरलेला अर्ज बरोबर आहे याची खात्री करावी व नंतरच I Agree या बटणावर Click करावे. अर्ज Submit झाल्यावर उमेदवारास अर्जात कोणताही बदल करता येणार नाही.

२०. अर्ज Submit झाल्यानंतर येणारा Registration Number उमेदवाराने नमूद करून घ्यावा आणि Print Application हे ऑप्शन Select करून ऑनलाईन अर्जाची Print out काढावी.

२१. सदरील Print out काढल्यानंतर शेवटी दिलेल्या जागेवर उमेदवाराने आपला स्वतः चा फोटो चिटकवावा आणि सोबतच्या रकान्यामध्ये काळया पेनाने स्वतः ची सही करावी. सदरील Print out उमेदवाराने आपल्याकडे पुढील कार्यवाहीसाठी जतन करून ठेवावी.